**मे. जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील परतूर तालुक्यातील गट नं. २३७, २३६, २३५, २३१, १८५, गाव चांगतपूरी येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २३/०४/२०२१ रोजी सकाळी ११:०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे व्हिडिओ कॉन्फारन्सिंग/ झूम मिटिंग ॲपद्वारे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

........................................................................................................................

मे. जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील परतूर तालुक्यातील गट नं. २३७, २३६, २३५, २३१, १८५, गाव चांगतपूरी येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २३/०४/२०२१ रोजी सकाळी ११:०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे व्हिडिओ कॉन्फारन्सिंग/ झूम मिटिंग ॲपद्वारे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य व्हिडिओ कॉन्फारन्सिंग/ झूम मिटिंग ॲपच्या माध्यमातून उपस्थित होते.

१. (श्री. केशव नेटके)
निवासी उप जिल्हाधिकारी
जालना : अध्यक्ष

२. (श्री. डॉ. प्रविण जोशी)
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, औरंगाबाद : सदस्य

३. (श्रीमती. डॉ. योगिनी बाळंखे)
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना : समन्वयक

जालना जिल्हयातील परतूर  तालुक्यात असलेल्या प्रस्तावित वाळुघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी त्यांचा प्रतिनिधी म्हणून श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांची नियुक्ती करून त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सुनावणी ची प्रक्रिया पूर्ण करणे साठी सुचविले. त्या नुसार सदर सुनावणी मा. निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि. २३ एप्रिल २०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आयोजित करण्यात आली होती. सदर नियोजित सुनावणी जागतिक आपत्ती कोविड १९ लॉकडाऊनमुळे जिल्हाधिकारी कार्यालय येथे तसेच झूम मिंटींग ॲपद्वारे घेण्यात आली.

डॉ. योगिनी बाळंखे , उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे. मा. अप्पर जिल्हाधिकारी, जालना यांचा जालना जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. ०४/०२/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी देशातील तसेच जिल्हयातील कोरोना व्हायरसचा प्रादूर्भाव लक्षात घेऊन आणि सुनावणीसाठी १०० पेक्षा जास्त नागरिकांची उपस्थितीची शक्यता लक्षात घेऊन सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय येथे तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी जागतिक आपत्ती कोविड १९ लॉकडाऊनमुळे झूम मिटिंग ॲपद्वारे घेण्यात येत आहे.  सदर बाबतची जाहीर सुचना दि. २१/०३/२०२१ रोजी दै. सकाळ (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना

सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना येथे पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना
- जिल्हा परिषद, जालना
- तहसिलदार, तहसिल कार्यालय तालूका –परतूर, जि. जालना
- ग्रामपंचायत कार्यालय -  तालुका परतूर – मौ. चांगतपूरी

* उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना
* प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद
* (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ  मुंबई
* पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

डॉ. योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ जालना यांचेकडे वाळूघाटाबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, आक्षेप, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात. समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. निवासी उपजिल्हाधिकारी, जालना व अध्यक्ष, यांच्या परवानगीने डॉ. योगिनी बाळंखे समन्वयक यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

त्यास अनुसरुन प्रकल्पाच्या श्री. तूषार निकम, जिल्हा खनिकर्म अधिकारी, यांनी जालना जिल्हयातील परतूर, तालुक्यात असलेल्या वाळुघाटांच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती दिली. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

जालना जिल्हयातील परतूर तालुक्यात असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण – २०१९ / पी.के.०१ / ता.के. ३ दि. ३ डिसेंबर,२०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते.

सदर मायनिंगमध्ये ड्रिलिंग आणि ब्लास्टिंगशिवाय ओपनकास्ट मॅन्युअल पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. केवळ कुदळ, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. टॅक्टर ट्रॉली ट्रकद्वारे वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. ग्रीनबेल्ट डेव्हलपमेंट प्लॅन अंतर्गत ५०० झाडे लावण्यात येतील. व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. सदर प्रस्तावित

प्रकल्पामुळे स्थानिक रहिवाशांना अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर डॉ. योगिनी बाळंखे, समन्वयक यांनी व्हीसीमधील उपस्थितांना आपल्या लेखी / तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गांव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका परतूर- गाव चांगतपूरी**

| अ.क्रं. | वाळूघाटाचे नांव | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|
| ०१. | चांगतपूरी,<br>गट क्रं. २३७, २३६, २३५, २३१, १८५. | ४.८१ | १२७६१ |

मा. अध्यक्षांनी तहसिलदार परतूर यांना विचारणा केली की, परतूर तालुक्यातील सरपंच / लोकप्रतिनिधी / नागरिक यांना कांही बोलायचे आहे का? किंवा कोणाची सुचना वगैरे आहे का? मा. अध्यक्षांनी तहसिलदार परतूर यांना आपला काही मुददा असल्यास मांडण्यास सांगितले. त्यास अनुसरुन तहसिलदारांनी सांगितले की, त्यांच्या कार्यालयाकडून कांहीही सुचना अथवा आक्षेप नाही. मा. अध्यक्षांनी त्यांच्या कार्यालयात सदर जाहीर लोक सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींची / नागरिकांची नांवे, पत्ते, मोबाईल क्रमांक व तहसिल कार्यालयाचा अभिप्राय इत्यादी बाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचेकडे सादर करण्याचे आदेशित केले.

डॉ. योगिनी बाळंखे , उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. डॉ. प्रविण जोशी, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी पर्यावरणीय व्यवस्थापनासाठी आर्थीक तरतुद

करण्याचा मुददा उपस्थित केला. सदर मुदयाची पुर्तता करण्याचे प्रकल्प सल्लागारांनी मान्य केले.

तसेच सदर वाळघाटाच्या उत्खनाबाबत दिं. २३/०४/२०२१ रोजी लेखी आक्षेप प्राप्ता झाला आहे. तसेच त्यावरील खुलासा प्रकल्पाधारकाने सादर केला असून सोबत जोडला आहे.

सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

प्र.म.जोशी

**(डॉ.प्र.म.जोशी)**
सदस्य

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी
प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

**(केशव नेटके)**
अध्यक्ष

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
निवासी उप जिल्हाधिकारी, जालना

Ryogini

**(डॉ.योगिनी बाळंखे)**
समन्वयक
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि. मंडळ, जालना

जिल्हाधिकारी कार्यालय जालना
(खनिकर्म विभाग)
प्रशासकिय इमारत सर्व्हे नं ४८८, जालना

| | |
|---|---|
| दुरध्वनी क्र (०२४८२) २२४७०० | फॅक्स क्र (०२४८२) २२५३२६ |
| E-mail ID –rdcjalna@gmail.com | संकेतस्थळ www.jalna.nic.in |

| | |
|---|---|
| जा.क्र.२०२०/मशाका/गौख/कावी २४८ | दिनांक २७.०४.२०२१ |

प्रति,
तहसिलदार,
परतूर

**विषयः- मौ. चांगतपुरी येथील वाळूघाट लिलावास आक्षेप असलेबाबत**

संदर्भः- आपले पत्र क्र. २०२१/गौ.ख/गौ.वा./कावी दि. १६.०४.२०२१

विषयांकीत प्रकरणी मौ. चांगतपुरी ता. परतूर या वाळूघाटाच्या लिलावाकरिता दि. २३.०४.२०२१ रोजी ऑनलाईन जनसुनावणी घेण्यात आली असता, सदर वाळूघाटाचा लिलाव करण्यास ग्रामस्थ चांगतपुरी ता. परतूर यांचा आक्षेप असलेबाबत संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

तथापि, सन २०२०-२१ या वर्षाच्या वाळूघाट लिलावाकरिता मौ. चांगतपुरी ता. परतूर ग्रामपंचायत ठराव होकारार्थी प्राप्त झाला असल्याचे अनुषंगाने सदर वाळूघाटाचा मायनिंग प्लॅन तयार करुन जनसुनावणी घेण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामस्थ चांगतपुरी ता. परतूर यांची विनंती याद्वारे अमान्य करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे उत्तर संबंधित ग्रामस्थ यांना कळवून तामिल प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

स्वाक्षरीत/-
**(अंकुश पिनाटे)**
**अप्पर जिल्हाधिकारी , जालना**

महाराष्ट्र शासन

# तहसिल कार्यालय, परतूर

प्रशासकिय इमारत, परतूर, ता.परतूर,जि.जालना

दुरध्वनी क्रमांक : 02484 - 221028 ई - मेल : tahasildarpartur@gmail.com

जा.क्र.2021/गौख/अ.गौ.वा./कावी दिनांक :16/4/2021

प्रति,
मा. अपर जिल्हाधिकारी,
जालना

**विषयः- मौ. चांगतपुरी येथील वाळूघाट लिलावास आक्षेप असल्याबाबत.**

संदर्भः- तलाठी सजा गोळेगाव ता.परतूर यांचे पत्र दिनांक २३/४/२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, मौ. चांगतपुरी ता. परतूर येथील वाळूघाटाबाबत दिनांक २३/४/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यावरण विषयक Zoom meeting app व्दारे जनसुनावणी घेण्यात आली आहे. या सुनावणीसाठी मौ. चांगतपुरी येथील सरपंच,ग्रामसेवक, पोलिस पाटील व ग्रामस्थ हे उपस्थित राहीले नाहीत. परंतु ग्रामस्थ, चांगतपुरी यांनी तलाठी सजा गोळेगाव यांचे फार्मत आक्षेप अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.

सदरील आक्षेप अर्ज पुढील कार्यवाहीसाठी आपणास सविनय सादर करण्यात येत आहे.

सोबतः- आक्षेप अर्जाची छायांकीत प्रत.

23.4.21

तहसिलदार परतूर

प्रतिलिपीः-

मा. उपविभागीय अधिकारी, परतूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

तहसिलदार परतूर

दि 23/4/

मा. तहसिलदार साहेब.
तहसिल कार्यालय परतूर.

विषय :- मौ. चांगतपुरी येथील वाळू घाट लीलावास आक्षेप असल्या बाबत.

महोदय,
वरील विषयी अहवाल सादर करतो की मौ. चांगतपुरी ता. परतूर येथील ग्रामस्थांचा वाळू घाटाच्या लीलावास आक्षेप अर्ज केला असून सदर आक्षेप अर्जाला अहवाल कार्यालयास सविनय सादर

सोबत
आक्षेप अर्ज.

तलाठी सज्जा
गोळेगाव

जा. क्र. 28
23-4-14

दि. 23/4/2021

मा. तहसिलदार साहेब,

तहसिल कार्यालय परतूर

विषय :- मौजे चांगतपुरी येथील वाळू घाट लिलावास आम्हा गावकऱ्यांचा आक्षेप असणे बाबत

मा. महोदय

वरील विषयी आक्षेप अर्ज सादर करतो की,

① मौजे चांगतपुरी या गावच्या शिवाराच्या दक्षिण बाजूस गोदावरी नदीचे पात्र आहे. आमच्या गावातील एकूण रहिवासी असलेल्या लोकसंख्येपैकी 100% जीवन शेतीवर अवलंबून आहे. नदी पात्रातील वाळू उपसा झाल्यामुळे पाण्याची पातळी खालावली जाते व आमच्या शेतीतील उत्पन्नावर त्याचा परिणाम होतो

② वाळू उपसामुळे गुरांना व गावाला पिण्याच्या पाणी टंचाईचा सामना करावा लागतो.

③ नदीपात्रात वाळू उपसाकरिता कोणत्याही प्रकारचा रस्ता नाही

④ वाळू उपसा हा नियमानुसार न करता (जेसीबी व पोकलेनच्या सहाय्याने केला जातो. वाळूने भरलेल्या 6, ते 7, टायरच्या मो[ठ्या] गाड्या भरून नेल्यामुळे गावाच्या दळणवळणाच्या रस्ता खराब होतो खराब रस्ता झाल्यामुळे येणे जाणे अडचण व वैद्यकीय गरजेकरीता अडचण निर्माण होते.

करिता मौजे चांगतपुरी या गावाचा वाळू धक्याचा लिलाव करण्यात येऊ नये अशी चांगतपुरी येथील ग्रामस्थांची विनंती आहे.

आमच्या आक्षेप अर्ज देऊनही प्रशासनाने वाळू धक्याचा लिलाव केला तरी आम्ही ग्रामस्थ लोकशाही मार्गाने त्यास विरोध करू व वाळू धक्यातील वाळूचा उपसा होऊ देणार नाही —

करिता आमच्या आक्षेप अर्जाचा विचार करण्यात यावा हि नम्र विनंती.

आक्षेप अर्ज सादर करणारे गावातील ग्रामस्थ.
खालील प्रमाणे

1. सुशील गणेशराव तौर — [signature]
2. राजेभाऊ आपासाहेब तौर — [signature]
3. गणेश सर्जेराव तौर — जी. एस. तौर
4. गोपीनाथ किसन नरवडे — गोपीनाथ नरवडे
5. नंदकुमार वशिष्ठ जाधव — [signature]
6. विश्वास अपासाहेब तौर — [signature]
7. बाबासाहेब माधव तौर — [signature]
8. अशोक भिमराव अंकुवे —
10. निळकंठ बापुराव तौर — [signature]
11. दत्तात्रय भाऊराव तौर — [signature]

रामप्रसाद दत्तात्रय टाके — [signature]
पांडुरंग बापुराव तौर — P. B. TAUR
धर्मराज अंकुश तौर — धरमराज तवर
शैलेन्द्र निवृत्ती तौर — [signature]
बंडु गुंजकर — [signature]
गणेश कुंडलिक गुंजकर — [signature]
राजाराव बाजीराव तौर — [signature]

# पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील गट नं २३८, २३६, २३५, २३१, १८५, गाव - चांगतपूरी या प्रस्तावित वाळूघाटांच्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबत.

दिनांक :- २३/०४/२०२१ वेळ :- सकाळी ११.०० वा.

ठिकाण :- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
(ZOOM Meetings App द्वारे)

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | श्री. केशव नेटके निवासी उपजिल्हाधिकारी, जालना | अध्यक्ष | [signature] |
| २. | श्री पी.एम. जोशी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि मंडळ, औरंगाबाद | सदस्य | [signature] २३/४/२०२१ |
| ३. | श्री. अंकुश पिनाटे अप्पर जिल्हाधिकारी, जालना | | [signature] |
| ४. | श्रीमती डॉ. योगिनी बांळवे उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना | समन्वयक | [signature] २३/०४/२०२१ |








महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
उप-प्रादेशिक कार्यालय, जालना.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
उप-प्रादेशिक कार्यालय, जालना.
जालना जिल्ह्यातील परतुर तालुक्यातील
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबत
२३.०४.२०२१
सकाळी ११.०० वा.
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना. व्हिडीओ कॉन्फरंन्सिंग द्वारे
(Zoom Meetings App )
मोबाईल फोन द्वारे Zoom Meetings App स्थापित करुन
http://us04web.zoom.us/j या संकेतस्थळावरुन
जोडणी लिंक वापरुन
मध्ये सहभागी होऊ शकता.




प्रदूषण नियंत्रण मंडळ








महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ